**मुंबई विद्यापीठ, मुंबई येथील "प्रो.बाळ आपटे सेंटर फॉर स्टडिज इन स्टूडंटस ॲन्ड युथ मुव्हमेंट" केंद्राचे बांधकाम करण्यासाठी निधी वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन ज्ञापन क्रमांक:- भाडेक-२०२६/ई-१३५३३२८/विशि-२**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.**
दिनांक :- २१ ऑगस्ट, २०२६.

**शासन ज्ञापन :-**

मुंबई विद्यापीठ, मुंबई येथील "प्रो.बाळ आपटे सेंटर फॉर स्टडिज इन स्टूडंटस ॲन्ड युथ मुव्हमेंट" केंद्राचे बांधकाम करण्यासाठी रु.२०,४९,००,०००/- किंमतीच्या अंदाजपत्रकास दि.१९.०६.२०२६ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

विद्यापीठाने केलेल्या विनंतीनुसार "प्रो.बाळ आपटे सेंटर फॉर स्टडिज इन स्टूडंटस ॲन्ड युथ मुव्हमेंट" केंद्राचे बांधकाम करण्यासाठी रु.१०,००,००,०००/- (रुपये दहा कोटी फक्त) इतका निधी विद्यापीठास खालील अटीच्या अधीन राहून वितरीत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे :-

१) शासनाकडून ज्या प्रयोजनार्थ रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे, ही रक्कम त्याच प्रयोजनार्थ खर्च करण्यात यावी.
२) विहीत कालावधीमध्ये सदरचा खर्च पूर्णपणे करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी आणि त्याबाबत तपशीलवार खर्चाची माहिती व विनियोग प्रमाणपत्र (Utilization Certificate) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेमार्फत शासनास विहित वेळेत सादर करण्यात यावे.
३) वरील रक्कमेची सर्व कागदपत्रे व हिशेब महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई किंवा प्रकरण परत्वे महालेखापाल - २ नागपूर यांनी सदर कामाकरीता प्राधिकृत केलेले अधिकारी यांना तपासण्याचे अधिकार असून, त्यांनी मागणी केल्यास, संबंधीत कागदपत्रे त्यांच्याकडे तपासणीकरीता विद्यापीठाने सादर केली पाहिजेत.

२. सदरहू मंजूर झालेला निधी कोषागारातून आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून सहायक संचालक (लेखा), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व नियंत्रक अधिकारी म्हणून संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१६ यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. सदर खर्च "मागणी क्र.डब्ल्यू-२, मुख्य लेखाशीर्ष २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०३-विद्यापीठीय व उच्च शिक्षण, १०२-विद्यापीठांना सहाय्य, (००) (२३) मुंबई विद्यापीठाचा विकास (२२०२ एच ६५२), ३१ अनुदाने" या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतूदीतून खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर शासन ज्ञापन, महाराष्ट्र विनियोजन अधिनियम २०२६, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३ दि.०९.०४.२०२६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. या शासन परिपत्रकातील परिशिष्ट मधील अनुक्रमांक ९ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे.

५. सदर शासन ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने (अनौपचारिक संदर्भ क्र.४०५/२०२६/व्यय-५ दि.०८.०६.२०२६) निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८२११५३१५६१००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.08.21 15:32:44 +05'30'

**(प्रताप पां. लुबाळ)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१/२ महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
७. महालेखापाल, (लेखापरीक्षण) -१/२ महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
८. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. मुख्य अभियंता ,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई .
१०.कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
११.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१२.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, गोरेगाव, मंबई.
१३.अवर सचिव (अर्थसंकल्प शाखा) ,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.कक्ष अधिकारी (व्यय-५), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.निवडनस्ती (विशि-२), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.